0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.१८/११/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८३/२०११/जा.९४२, दि. २३/११/२०११ व २९/११/२०११.

३) मे. बुंगे इंडिया प्रा.लि. चे सहायक व्यवस्थापक श्री. सचिन विजय देसाई व श्री. प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेले दि.२९/११/२०११ रोजीचे संयुक्त लेखी निवेदन.

४) मे. बुंगे इंडिया प्रा.लि. चे सहायक व्यवस्थापक श्री. सचिन विजय देसाई यांनी कंपनीच्या वतीने सादर केलेले दि.०७/१२/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.८३/२०११/जा. १०४९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा याचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : 31 /१२/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १७/११/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२, काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे विनापरवाना खाद्यतेल व वनस्पतीचा साठा व विक्री केली जात असल्याने, या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचांसमवेत उक्त ठिकाणी प्रवेश केला. भेटीच्या वेळी गाळ्यामध्ये उपस्थित असलेल्या व्यक्तीस अधिकाऱ्यांनी त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर इसमास गाळ्यामध्ये कोणकोणते पदार्थ साठवले जातात याबाबतची विचारणा केली असता, सदर गाळ्यामध्ये खाद्यतेल व वनस्पतीची साठवणूक केली जात असल्याचे त्याने पंचासमक्ष मान्य केले. या संदर्भात शिधावाटप यंत्रणेकडील खाद्यतेल व वनस्पतीच्या व्यवसायाचा व साठवणूकीचा परवाना

घेतलेला आहे किंवा कसे, याबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा केली व संबंधित इसमाकडे तत्सम कागदपत्रांची मागणी केली असता, त्याचेकडे तसा कोणताही परवाना नसल्याची माहिती सदर इसमाने पंचासमक्ष अधिकाऱ्यांना दिली व अशा प्रकारचा परवाना मिळण्यासाठी त्यांनी कोणत्याही प्राधिकरणाकडे अर्ज केलेला नसल्याचेही सदर इसमाने पंचासमक्ष कबूल केले. गोदामातील खाद्यतेल व वनस्पतीचा साठा हा विनापरवाना अनधिकृतपणे विक्री करण्यासाठीच केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्यामुळे अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरील साठ्याची मोजदाद केली असता, वनस्पती - ९८३७२ लिटर्स व खाद्यतेल - १५६७२.२० लिटर्स असा साठा आढळला.

वरीलप्रमाणे साठा गणना झाल्यानंतर एच-११/१२, राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, काल्हेर मध्ये व्यवसाय करणारे मे. बुंगे इंडिया प्रा. लि. यांचा त्याच इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये गाळा क्र. अे.क्यु. येथेही वनस्पती व खाद्यतेलाचा साठा असल्याचे अधिकाऱ्यांना समजल्याने त्यांनी पंचासमवेत सदर गाळ्याच्या ठिकाणी भेट दिली. सदरच्या गाळा क्र. अे.क्यु. मधील साठ्याची अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष मोजदाद केली असता, वनस्पती - ५८३३६ लिटर्स व खाद्यतेल- ३२० लिटर्स असा साठा आढळला.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष मे. बुंगे इंडिया प्रा.लि. यांच्या गाळा क्र. एच-११ व १२ आणि ए.क्यु. या २ गाळ्यांमधील साठ्याची बेरीज केली असता, मे. बुंगे इंडिया प्रा.लि. यांचेकडे खालील प्रमाणे खाद्यतेल व वनस्पतीचा साठा आढळल्याबाबत उपस्थित इसम प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर यांचा जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदविला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | साठा लिटर्समध्ये | साठा क्विंटलमध्ये |
|---|---|---|---|
| १ | वनस्पती | १५६७०८ | १४२६.०५ |
| २ | खादयतेल | १५९९२.२० | १४५.५२ |
| | एकुण वनस्पती/खाद्यतेलाचा साठा | १७२७००.२० | १५७१.५७ |

उपरोक्त नमुद विनापरवाना साठवणूक केलेल्या खादयतेल व वनस्पतीचा साठा, दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम २(Z)(IV)(VI), ३, ४, १० चा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चा भंग केला असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्याने दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५(सी) अन्वये सदरचा संपुर्ण खादयतेल व वनस्पतीचा विनापरवाना/अनधिकृत असलेला साठा पंचांसमक्ष जागीच सिलबंद करुन जप्त करण्यात आला असून सदर जप्त केलेल्या खादयतेलाच्या साठयाचा सुपुर्दनामा करण्यात येऊन जप्त करण्यात आलेला साठा मे. बुंगे इंडिया प्रा.लि. चे प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर

यांचेकडे सुपूर्द करुन, सदर साठा पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत जैसेथे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे त्यांना सुचित केले.

अशाप्रकारे मे. बुंगे इंडिया प्रा. लि., राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२, काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे यांनी नमुद पत्यावर मोठया प्रमाणात साठवणूक केलेल्या खादयतेल व वनस्पती या जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने तसेच विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनाचश्यक वस्तु कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहुन उपरोक्त नमुद खादयतेलाचा १५९९२.२० लिटर्स साठा व वनस्पतीचा १५६७०८ लिटर्स असा मिळून एकुण खाद्यतेल व वनस्पतीचा एकूण १७२७००.२० लिटर्स म्हणजेच १५७१.५७ क्विंटल साठा घटनास्थळीच जप्त करुन सुपूर्दनामा करण्यात आलेला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप; अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २९/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि. २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. बुंगे इंडिया प्रा.लि. चे सहायक व्यवस्थापक श्री. सचिन विजय देसाई व श्री. प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर हे कंपनीने प्राधिकृत केलेल्या प्राधिकार पत्रासह उपस्थित राहिले व वाचावे क्र. ३ अन्वये कंपनीच्या वतीने संयुक्त लेखी निवेदन सादर केले. सुनावणीच्या दरम्यान जप्त केलेल्या खाद्यतेल/वनस्पतीच्या खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता आवश्यक असणारा शिधावाटप विभागाचा घाऊक परवाना घेतला नसल्याचे सांगितले. सदर साठ्याचा पुरवठा त्रिची, तामिळनाडू येथून होत असल्याचे सांगून नमूद ठिकाणी आवक झालेल्या खाद्यतेल/वनस्पतीच्या साठ्याबाबत व कंपनीकडील इतर अनुज्ञप्ती व वाहतूक करारनामा इत्यादी दस्ताऐवज सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. सबब, पुढील सुनावणी दि.०७/१२/२०११ ठेवण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. बुंगे इंडिया प्रा.लि. चे सहायक व्यवस्थापक श्री. सचिन विजय देसाई हे उपस्थित राहिले व वाचावे क्र. ४ अन्वये कंपनीच्या वतीने लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. बुंगे इंडिया प्रा.लि. चे सहायक व्यवस्थापक श्री. सचिन विजय देसाई व श्री. प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर यांनी कंपनीच्या वतीने लेखी निवेदन सादर करुन युक्तीवाद केला की, ते खाद्यतेल/वनस्पतीचे उत्पादक असून त्यांचे उत्पादन इतर राज्यात होत असून त्यांचे भिवंडी येथे नमूद ठिकाणी वेअरहाऊस आहे. संदर वेअरहाऊसमध्ये खाद्यतेलाची साठवणूक करुन तेथून त्याच्या वितरकाकडे विक्रीसाठी पाठविण्यात येते. गोदामावरील नमूद पत्त्यावर त्यांच्याकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे खाद्यतेल साठवणूकीचा परवाना आहे. तसेच संदर गोदामामध्ये कंपनीच्या वतीने उत्पादीत केलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याची साठवणूक केली जाते. ते खाद्यतेलाचे उत्पादक असल्याने त्यांचा खरेदी या व्याख्येशी संबंध नसून त्यांच्या कंपनीकडून फक्त विक्री व साठवणूक केली जाते. यावरुन ते उत्पादक असल्याने त्यांना अनुज्ञप्तीची गरज नसल्याचे नमूद केले आहे. तथापी, त्यांनी जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा साठा मुक्त करण्यास विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित बुंगे इंडिया प्रा. लि. कंपनीचे सहायक व्यवस्थापक श्री. सचिन विजय देसाई यांनी कंपनीच्या वतीने लेखी निवेदन सादर करुन युक्तीवाद केला की, यापूर्वीच्या सुनावणीमध्ये सुचित केल्यानुसार त्यांचे उत्पादनाचे ठिकाणी असलेल्या १) आय.ई.एम. हे १९५१ अंतर्गत उद्योग प्रमाणपत्र, २) तिरुचिरपल्ली सिटी कॉर्पोरेशन यांचेकडून मे. बुंगे इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या नावे उत्पादनाच्या ठिकाणी खाद्यतेल/वनस्पतीचे उत्पादन, साठवणूक, विक्री व वितरण साठी अनुज्ञप्ती क्र. ८७५/२००९, ३) फॅक्टरी लायसन्स क्र. १७०८२, ४) ग्राहक संरक्षण, अन्न व नागरी पुरवठा विभाग, भारत सरकार यांचेकडून उत्पादनाच्या ठिकाणी खाद्यतेल/वनस्पतीच्या उत्पादनाच्या क्षमतेकरिता अनुज्ञप्ती क्र. व्ही.ओ.पी./टी.एन./व्ही-१४/२०११ दिनांक २०/०४/२०११, ५) ग्राहक संरक्षण, अन्न व नागरी पुरवठा विभाग, भारत सरकार यांचेकडून सॉल्वंट ॲक्सट्रक्टेडच्या वापरासाठी नोंदणी प्रमाणपत्र, ६) मे. पिथांमपुर बॉम्बे रोडवेस या सोबतचा वाहतूक करारनामा व ७) मे. अेलाईट

रोडवेस प्रा.लि. यासोबतचा वाहतूक करारनामाच्या छायांकित प्रती सादर केले व त्यांचा जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा साठा त्यांना परत करण्यास विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले. 1005

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १७/११/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२, काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे विनापरवाना खाद्यतेल व वनस्पतीचा साठा व विक्री केली जात असल्याने, या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी त्यांचे पथक व पंचासमवेत उक्त ठिकाणी भेट देऊन तेथे उपस्थित प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर यांना अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गाळ्यांमध्ये कोणकोणते पदार्थ साठवले जातात याबाबतची विचारणा केली असता, सदर गाळ्यामध्ये खाद्यतेल व वनस्पतीची साठवणूक केली जात असल्याचे त्याने पंचासमक्ष मान्य केले. या संदर्भात शिधावाटप यंत्रणेकडील खाद्यतेल व वनस्पतीच्या व्यवसायाचा व साठवणूकीचा परवाना घेतलेला आहे किंवा कसे, याबाबत अधिकाऱ्यांनी विचारणा करुन तत्सम कागदपत्रांची मागणी केली असता, त्याचेकडे तसा कोणताही परवाना नसल्याची तसेच अशाप्रकारचा परवाना मिळण्यासाठी त्यांनी कोणत्याही प्राधिकरणाकडे अर्ज केलेला नसल्याचे पंचासमक्ष कबूल केले. गोदामातील खाद्यतेल व वनस्पतीचा साठा हा विनापरवाना अनधिकृतपणे विक्री करण्यासाठीच केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्यामुळे अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरील साठ्याची मोजदाद केली असता, वनस्पती - ९८३७२ लिटर्स व खाद्यतेल - १५६७२.२० लिटर्स असा साठा आढळून आला. सदर साठ्याची गणना झाल्यानंतर एच-११/१२, राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, काल्हेर मध्ये व्यवसाय करणारे मे. बुंगे इंडिया प्रा. लि. यांचा त्याच इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये गाळा क्र. अे.क्यु. येथेही वनस्पती व खाद्यतेलाचा साठा असल्याचे अधिकाऱ्यांना समजल्याने त्यांनी पंचासमवेत त्या ठिकाणी भेट दिली. सदर गाळा क्र. अे.क्यु. मधील साठ्याची अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष मोजदाद केली असता, वनस्पती - ५८३३६ लिटर्स व खाद्यतेल - ३२० लिटर्स असा साठा आढळून आला.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष मे. बुंगे इंडिया प्रा.लि. यांच्या गाळा क्र. एच-११ व १२ आणि ए.क्यु. या दोन्ही गाळ्यांमधील साठ्याची बेरीज केली असता, मे. बुंगे इंडिया प्रा.लि. यांचेकडे वनस्पतीचा १५६७०८ लिटर्स

(१४२६.०५ क्विंटल) व खाद्यतेलाचा १५९९२.२० लिटर्स (१४५.१२ क्विंटल) असा मिळून एकुण १७२७००.२० लिटर्स (१५७१.५७ क्विंटल) साठा विनापरवांना आढळल्याबाबत उपस्थित इसम प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर यांचा जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदविला.

उपरोक्त नमुद विनापरवाना साठवणूक केलेल्या खादयतेल व वनस्पतीचा साठा, दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम २(Z)(IV)(VI), ३, ४, १० चा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चा भंग केला असल्याचे संकृतदर्शनी निदर्शनास आल्याने दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५(सी) अन्वये सदरचा संपुर्ण खादयतेल व वनस्पतीचा विनापरवाना असलेला साठा पंचासमक्ष जागीच सिलबंद करुन जप्त करण्यात आला असून सदर जप्त केलेल्या खादयतेलाच्या साठयाचा सुपुर्दनामा करण्यात येऊन जप्त करण्यात आलेला साठा मे. बुंगे इंडिया प्रा.लि. चे प्रसाद बाळकृष्ण बांदिवडेकर यांचेकडे सुपूर्द करुन, सदर साठा पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत जैसेथे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे त्यांना सुचित केले.

मे. बुंगे इंडिया प्रा. लि. या कंपनीने सादर केलेल्या खुलाशात, ते खाद्यतेल/वनस्पतीचे उत्पादक असून त्यांचे उत्पादन इतर राज्यात होत असून त्यांचे भिवंडी येथे नमूद ठिकाणी वेअरहाऊस आहे. सदर वेअरहाऊसमध्ये खाद्यतेलाची साठवणूक करुन तेथून त्यांच्या वितरकाकडे विक्रीसाठी पाठविण्यात येते. गोदामावरील नमूद पत्त्यावर त्याच्याकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे खाद्यतेल साठवणूकीचा परवाना आहे. तसेच सदर गोदामामध्ये कंपनीच्या वतीने उत्पादीत केलेल्या खाद्यतेलांचा साठ्याची साठवणूक केली जाते. ते खाद्यतेलाचे उत्पादक असल्याने त्याचा खरेदी या व्याख्येशी संबंध नसून त्यांच्या कंपनीकडून फक्त विक्री व साठवणूक केली जाते. यावरुन ते उत्पादक असल्याने त्यांना अनुज्ञप्तीची गरज नसल्याचे नमूद केले आहे. तसेच त्यांचे उत्पादनाचे ठिकाणी असलेल्या १) आय.ई.एम. हे १९५१ अंतर्गत उद्योग प्रमाणपत्र, २) तिरुचिरपल्ली सिटी कॉर्पोरेशन यांचेकडून मे. बुंगे इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या नावे उत्पादनाच्या ठिकाणी खाद्यतेल/वनस्पतीचे उत्पादन, साठवणूक, विक्री व वितरण साठी अनुज्ञप्ती क्र. ८७५/२००९, ३) फॅक्टरी लायसन्स क्र. १७०८२, ४) ग्राहक संरक्षण, अन्न व नागरी पुरवठा विभाग, भारत सरकार यांचेकडून उत्पादनाच्या ठिकाणी खाद्यतेल/वनस्पतीच्या उत्पादनाच्या क्षमतेकरिता अनुज्ञप्ती क्र. व्ही.ओ.पी./टी.एन./व्ही-१४/२०११ दिनांक २०/०४/२०११, ५) ग्राहक संरक्षण, अन्न व नागरी पुरवठा विभाग, भारत सरकार यांचेकडून सॉल्वंट ॲक्सट्रक्टेडच्या वापरासाठी नोंदणी प्रमाणपत्र, ६) मे. पिथांमपुर बॉम्बे रोडवेस या सोबतचा वाहतूक करारनामा व ७) मे. अेलाईट रोडवेस प्रा.लि. यासोबतचा वाहतूक करारनामाच्या छायांकित प्रती

सादर केल्या आहेत. तथापी, त्यांनी त्यांचा जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा साठा त्यांना परत करण्यास विनंती केली.

तथापी, केंद्रशासनाचे, ग्राहक बाबी, अन्न व सार्वजनीक वितरण मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्र. २२२७(अ) दिनांक २७/०९/२०११ अन्वये खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या व्यापारावर दिनांक ३०/९/२०१२ पर्यंत निर्बंध आणलेले आहेत.

दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसन्सीग ऑर्डर १९९८ अन्वये तांदूळ, डाळी/कडधान्य, खाद्यतेल/वनस्पती, खाद्यतेल बिया यांचा व्यवसाय करण्याऱ्या व्यापाऱ्यांना परवाना घेणे क्रमप्राप्त आहे. ग्राहक सरक्षण, अन्न व नागरी पुरवठा, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि.१६/०६/२००३ रोजी पारीत केलेले आदेश क्र. जीएसआर/४९०(ई) अन्वये डिलरची व्याख्या "Dealer means any person engaged in the business of purchase, movement, sale, supply, distribution or storage for sale of any of the commodities specified in clause ३ whether as a wholesaler or retailer or producer or manufacturer or exporter or importer and whether or not in conjunction with any other business and includes his representative or agent but does not include a producer or manufacturer or importer or exporter of sugar." म्हणजेच डिलरच्या नमूद केलेल्या व्याख्येमध्ये साखरेचे उत्पादक, आयातदार / निर्यातदार वगळता इतर सर्वांना डिलर म्हणून संबोधण्यात आल्याने त्यांना दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायन्ससिंग ऑर्डर, १९९८ अन्वये परवाना घेणे क्रमप्राप्त आहे.

मे. [illegible] इंडिया प्रा.लि. यांनी त्यांच्या राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२, काल्हेर गाव, भिवंडी, जिल्हा ठाणे या खाद्यतेल/वनस्पती साठवणूकीच्या ठिकाणी त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून वनस्पती व खाद्यतेल इ. घाऊक विक्रीसाठी अनुज्ञप्ती क्र. एस/बी/डब्ल्यू/३२४/कॉम-५०९८/२०११ अन्वये परवाना प्राप्त करुन घेतल्याचे आढळून आले.

तथापी, त्यांनी या विभागाकडून दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सीग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये खाद्यतेल/वनस्पतीच्या विक्री व साठवणूकीकरिता त्यांनी नमूद पत्त्यावरील साठवणूकीच्या ठिकाणी घाऊक परवाना घेतला नसल्याचे तसेच त्याकरिता संबंधित प्राधिकरणाकडे अर्जही केला नसल्याचे घटनास्थळी नोंदविलेल्या जबाबात तसेच सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तीवादामध्ये सिध्द झाले आहे.

0008

"महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध), आदेश, (सुधारणा) आदेश, २०१०" अन्वये महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर ठिकाणी खाद्यतेलांच्या साठवणूकीकरीता घाऊक परवानाधारकास विहीत कमाल मर्यादा ३०० क्विंटल आहे. मे. बुंगे इंडिया प्रा.लि., राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२ तसेच ए.क्यु., काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे हा विभाग महानगरपालिका क्षेत्रात येतो किंवा कसे ? याची अधिक खातरजमा करण्याकरीता ग्रामपंचायत काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे यांचे कार्यालयात विचारणा केली असता, त्यांनी या कार्यालयास सादर केलेले त्यांचे दिनांक २०/१२/२०११ रोजीच्या पत्रान्वये मे. बुंगे इंडिया प्रा.लि., राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२ तसेच ए.क्यु., काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे हे भिवंडी निजामपुरा महानगरपालिकाच्या हद्दीत येत नसुन त्याच्या ग्रामपंचायत काल्हेर यांचे महसुली हद्दीत येत असल्याचे नमुद केले आहे. म्हणजेच मे. बुंगे इंडिया प्रा.लि. याच्याकडे दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर, १९९८ अन्वये घाऊक परवाना असता, तरी त्यानी साठवणूक केलेला खाद्यतेल व वनस्पतीचा साठा हा विहित केलेल्या कमालमर्यादेपेक्षा अतिरिक्त असल्याचे दिसून येते.

मे. बुंगे इंडिया प्रा.लि. यांचा जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा उत्पादनाच्या ठिकाणी नसुन तो भिवंडी येथील नमुद गोदामात आढळून आला आहे. दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये खाद्यतेल/वनस्पतीच्या खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता नमुद गोदामावर आवश्यक असणारा घाऊक परवाना त्यानी घेतला नसल्याचे तसेच त्याकरिता संबंधित प्राधिकरणाकडे अर्जही केला नसल्याचे आढळून आल्याने सदरचा जप्त करण्यात आलेला खादयतेलांचा १५९९२.२० लिटर्स साठा व वनस्पतीचा १५६७०८ लिटर्स असा मिळून एकुण खाद्यतेल व वनस्पतीचा १७२७००.२० लिटर्स म्हणजेच १५६१.५७ क्विंटल साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे.

सबब, मे. बुंगे इंडिया प्रा.लि. यांनी दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ या आदेशाचा तसेच पर्यायाने जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० चा भंग केला असल्याचे सिध्द होत आहे.

सबब, मे. बुंगे इंडिया प्रा. लि. यांनी त्यांचे राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२ तसेच ए.क्यु., काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे या नमुद गोदामावर दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३ अन्वये साठवणूकीचा परवाना नसल्याने तसेच जप्त खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा विनापरवाना साठवणूक केल्याने त्यांनी दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल

डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ चे कलम ३, ४, ५, ६, ७, ८ व ९ तसेच जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने, मे. बुंगे इंडिया प्रा. लि. यांचेविरुध्द नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ।। १०८/२०११ दिनांक १४/१२/२०११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सबब, मे. बुंगे इंडिया प्रा. लि. यांनी त्यांचे राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२ तसेच ए.क्यु., काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे साठवणूक केलेल्या खाद्यतेल या जीवनावश्यक वस्तुचा विनापरवाना साठवणूक केलेला वनस्पतीचा १५६७०८ लिटर्स (१४२६.०५ क्विंटल) व खाद्यतेलाचा १५९९२.२० लिटर्स (१४५.५२ क्विंटल) असा मिळून एकूण १७२७००.२० लिटर्स (१५७१.५७ क्विंटल) साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ।। १०८/२०११ दिनांक १४/१२/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश :-</u>**

१) प्रस्तुत प्रकरणी मे. बुंगे इंडिया प्रा. लि. यांचे राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच, गाळा क्र. ११ व १२ तसेच ए.क्यु., काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे या पत्त्यावरील गोदामामधील जप्त करण्यात आलेला वनस्पतीचा १५६७०८ लिटर्स (१४२६.०५ क्विंटल) व खाद्यतेलाचा १५९९२.२० लिटर्स (१४५.५२ क्विंटल) असा मिळून एकूण १७२७००.२० लिटर्स (१५७१.५७ क्विंटल) साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण खाद्यतेल व वनस्पतीचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
मे. बुंगे इंडिया प्रा. लि.,
राजलक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, इमारत क्रमांक एच,
गाळा क्र. ११ व १२, काल्हेर गांव, भिवंडी, जिल्हा ठाणे.
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांचे मार्फत)

प्रत,
१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नारपोली पोलिस ठाणे, भिवंडी यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच जप्त करण्यात आलेले खाद्यतेलचा साठा हा नाशवंत असल्याने आदेशाची तात्काळ अमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशाप्रमाणे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे कार्यवाही करण्याकरिता पोलिसांना आवश्यक ती मदत करावी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.